# अभिवादन सभा

## प्रा. नलिनी पंडीत यांना आदरांजली वाहण्यासाठी शोकसभा

महाराष्ट्रातील एक प्रथितयश व अग्रगण्य विख्यात विचारवंत प्रा. नलिनी पंडीत यांचे दिनांक २६ जुलै २००९ रोजी शुश्रुषा रूग्णालयात हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दुखःद निधन झाले. निधना समयी त्यांचे वय ८२ वर्ष होते.

प्रा. नलिनी पंडीत यांनी महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीवर प्रकाश टाकणारे ग्रंथ लिहीले होते. त्यांची 'जातीवाद व वर्गवाद' आणि 'महाराष्ट्रातल्या राष्ट्रवादाचा विकास' ही पुस्तके गाजली. 'स्वातं>योत्तर दलितांची चळवळ', 'जागतिकीकरण आणि भारत', 'धर्मशासन आणि समाज' या पुस्तकांमुळे महाराष्ट्रातील विचारवंतांमध्ये त्यांनी स्वतःचा ठसा निर्माण केला. गांधी, आंबेडकर आणि महात्मा फुले यांचे विचार मार्क्सवादी दृष्टीकोनातून समाजासमोर मांडल्यामुळे या विचारांना एक नवीन परिमाण देण्याचे त्यांनी काम केले. मार्क्सवादी सिद्धांत्तातील वर्ग म्हणजे केवळ आर्थिक पायावरची वर्गवारी नव्हे अशी मांडणी करून जातीचे वास्तव विसरता येणार नाही अशी ठाम भूमिका आपल्या 'जातीवाद व वर्गवाद' या ग्रंथामधून मांडली. त्यांनी आपल्या ग्रंथांमधून गांधी, मार्क्स व फुले–आंबेडकर यांच्या विचारांचा समन्वय साधला. महाराष्ट्रातील पुरोगामी चळवळीला एक नवी दृष्टी देण्याचे फार मोलाचे काम त्यांनी केले.

नलिनीताईच्या निधनामुळे राज्यातील पुरोगामी चळवळीचे वैचारीक नेतृत्व काळाआड गेले आहे ही पोकळी भरून काढणे आता शक्य होणार नाही. नलिनीताईशी जवळचा सबंध असलेल्या आणि त्यांच्या विचाराने प्रेरीत असलेल्या महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांनी त्यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी शोकसभा आयोजित केली आहे.

सदर शोकसभा दिनांक *३ ऑगस्ट २००९ रोजी संध्याकाळी ६.०० वाजता वनमाळी हॉल, छबिलदास रोड, दादर– पश्चिम*, मुंबई ४०००२८ येथे आयोजित केली आहे. या सभेस साथी भाई वैद्य, प्रा. राम बापट, प्रा. पुष्पा भावे, अर्जुन डांगळे, वसुधा सरदार, महम्मद खडस, किशोर ढमाले, किशोर जाधव, किरण मोघे, मधु मोहिते, उषा मेहता, प्रताप आसबे उपस्थित रहाणार आहेत. प्रा. नलिनीताई पंडीत यांना आदरांजली वाहण्यासाठी आपण या शोकसभेस उपस्थित रहावे.

आपले विनित

समाजवादी महिला सभा, सोशालिस्ट फ्रंट, राष्ट्र सेवा दल, विद्रोही सांस्कृतिक चळवळ,
सत्यशोधक विद्यार्थी संघटना, सद्भावना संघ व ग्रंथाली